वर्ष तेरावे : अंक १८ : जून २०२५



# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA



Volume Thirteen : Issue 17 : JUNE 2025 Total Pages : 16 Rs. 10/-



प्रदर्शन

Hearing Impaired Children
performing during the opening of the exhibition



# COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

**वर्ष : १३ वे | अंक : १८**



**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे


## अंतरंग


**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**कलादालनमधील सुवर्णसंधी** ... ०३
– वैष्णवी जाधव

**मानासोपचारांची गरज आणि फायदे** ... ०५
– डॉ. वेलणकर

**Breaking Down The Wall of Silence** ... १०
- Mrs. Pallavi Sharma

**Expert Healing Through Gentle Hands and Kind Heart** ... १२
- Mrs. Pallavi Sharma



| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

In "our days" is what we hear very often. Yes in spite of very few resources, people were content and were better off. They were not too ambitious also. But in todays rat race all are only running and running, faster and faster. All this leads to stress which causes diabeties, blood pressure, migraine and what not.

Sai, mother of a child in Swaranaad, has gone a lot into details and translated into Marathi "Needs and benefits of psychotherapy", by Dr Yash Velankar. All the teachers and parents in Swaranaad will be benefited with this write up. She has given many options and tips regarding, why one should consult a psychologist, how to find one who is good at it and how to find out whether you are getting some benefit after a few sessions with the psychologist.

Then there is this boy Vasant Rathod, from Ambajogai, Beed district , who was detected with 100% hearing loss at the age of 6 months. But after a hurdle race of nearly 3 years he had a cochlear implant and is now on the right track.

Another write up is about the father and son team Dr. Avinash Wachasundar and Akshay Wachasundar.

They have been doing cochlear implants since last 14 and 5 years respectively. Both being ENT surgeons they attend to all the problems of ear nose and throat. Their expertise is undoubted.

Admissions are open in the preschool at Swaranaad at Kothrud and also at the residential mother and child project at Urawade Pirangut.

Please visit our website https....

◆◆◆

## कलादालनमधील सुवर्णसंधी

**वैष्णवी जाधव**
**पालक – स्वरनाद**

कसं लिहावं? किती लिहावं? आणि काय काय लिहावं? इतकं खूप काही आहे या फक्त तीन दिवसांत घडलेलं. नेहमीच माझ्या आर्यनसाठी कायम एक मार्ग उघडून देणारी माझी हि संस्था, कायम नवीन अनूभव देण्यासाठी नवीन संधी मिळवून देणारी, कायम हात देण्यासाठी आधार देण्यासाठी हि माझी संस्था उभी असते. अशीच पून्हा एक नवीन संधी कॉक्लिआ पुणे, स्वरनाद या संस्थेकडून श्री. एम. बी. नांबियार सर यांचे फोटोग्राफ्री प्रदर्शन यांच्यामूळे पुण्यातील सुप्रसिद्ध कलादालन बालगंधर्व येथे आर्यनच्या पेंटिंगचे प्रदर्शन भरवण्यासाठी ३ दिवसाचे प्रदर्श लावण्यात आले. फक्त आर्यनचेच नाही तर त्याच्यासारख्या इतर मुलांनापण संधी मिळाली.

२०२० मध्ये ग्राहकपेठ स्पर्धेत त्याचे एक गणपतीचे चित्र निवडण्यात आले होते आणि १० मुलांमध्ये त्याचे चित्र एका कोपऱ्यात एका बाजूच्या खूप चित्रांत एक होते. पण त्यावेळेसही मला तितकाच अभिमान होता की त्याचे गणपतीचे चित्र हे बालगंधर्व अशा आर्ट गॅलरीत लावले आहे आणि त्याला बक्षिस देणारे श्री. शि. द. फडणीस राज ठकरे यांचे गुरू हे होत. माहित नाही पण मी त्याचवेळेस पक्के ठरवले होते की एक दिवस असानक्की येईल त्याचे पेंटिंग या बालगंधर्वमध्ये लागतील आणि ती संधी पाच वर्षांनी चालून आली. आज एम.बी.नांबियारसर यांच्यामुळे त्याच्यासाठी त्यांनी एक भिंत त्याचे पेंटिंग लावण्यासाठी जागा दिली.

प्रदर्शन भरवण्यासाठी काय करावे लागते? काय काय राहून गेले? हा नवीन अनूभव मिळाला. महत्त्वाचे व आनंदाची गोष्ट म्हणजे या तीन दिवसात त्याच्या पेंटिंगसाठी मिळालेला प्रतिसाद, त्याचे ते लोकांनी तोंडभरुन केलेले कौतूक आणि डोक्यावर हात ठेवून दिलेले आशीर्वाद आणि पुढच्या भविष्यासाठी दिलेले ???? हे किती किती मी माझ्या झोळीमध्ये भरून घेऊ, असं मला झालं होतं. एखाद्या जादूच्या झोळीप्रमाणे माझं होतं. लोकं भरभरून देत होते आणि माझी झोळी भरतंच होती.

२ मे पासून हे प्रदर्शन सुरु होणार होते. आम्ही १ मे ला संध्याकाळी हॉलवर गेलो. तिथे गेल्यावर तिथल्या भिंती म्हणजे जिथे चित्र लावायचे आहे ती भिंत कशी आहे? याचा स्पर्श करुन एक वेगळा आनंद झाला. कारण त्या भिंतीला स्पर्श करण्याचा हक्क पण हा क्वचितच लोकांना मिळतो, असे मला वाटतं. त्यापुढे कुठले पेंटिंग कुठे लावायचे, कुठे छान वाटेल, कोणते छान दिसेल हे ठरवावं लागलं. म्हणजे यात ही एक कला आहे हे देखील समजले. पेंटिंग कसे लावावे? त्यासाठी काय काय सामान लागेल? प्रत्येक फ्रेमवर किंमत, नंबर इत्यादी माहिती मिळाली.

२ तारखेला सकाळपासून लवकर गेलो. पहिल्या दिवशी बघणारे प्रेक्षक

पाहिले ते शेवटच्या दिवशी शेवट बघणारे प्रेक्षक. हे सगळं मी कॅमेऱ्यात टिपून घेतले. अगदी मोठ्या लोकांपासून म्हणजेच श्री. चंद्रकांत पाटील यांच्या पासून ते झोळीतून १०१/– रूपये काढून देणाऱ्या आजी–आजोबांपर्यंतचे सर्व लोकांनी खूप आशीर्वाद दिले आणि यातच मी खूप काही मिळवलं.

लहान–लहान मुलं जेव्हा आर्यनचे पेंटिंग बघायचे, आई मला फुल आवडले... Wow... किती भारी ना..! मिती अप्रतिम आहेत... आई शपथ! अरे, ते पाणी बघ..! किती रियल वाटतं ना.... ते पाणी तर जिवंत लहणारे पाणी वाटते... खूप छान मस्त.... तो किती वर्षांचा आहे?... बापरे कमला आहे.... इतक्या लहान वयात?.... खुप सुंदर.. असाच मोठा हो... छान काढले... कुठे शिकला हा...? कधुपासून करतो... खूप, खूप, खूप... अशा वेगवेगळ्या व सुंदर, मला अभिमान वाटवा अशा त्याच्या पेंटिंग बद्दलच्या प्रतिक्रिया होत्या.

या तीन दिवसात मी व आर्यनने खूप काही शिकले आणि हे सर्वकाही आपोआप नाही मिळतं यामागे कोणाचा तरी हात, कोणाची तरी सोबत व कोणीतरी दिलेला म्हणजेच शिकण्यासाठी दिलेला एक अनूभव व दिलेला एक मंच असावा लागतो. तो मिळाला कॉक्लिया या स्वरनाद संस्थेकडून व श्री. एम. बी. नांबियार यांच्या फोटोग्राफच्या प्रदर्शनातून मिळाली. त्यासाठी मी त्यांचे व संस्थेचे मनापासून धन्यवाद मानते.

२०२० मध्ये एक चित्र, आता एक भिंत होती... यापूढे मात्र त्याचा संपूर्ण हॉल असेल, अशी मला खात्री आहे.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## मानासोपचारांची गरज आणि फायदे – डॉ. वेलणकर
## Need and Benefits of Psychotherapy - Dr. Yash Velankar

**डॉ. वेलणकर**

नोकरी, व्यवसाय शिक्षणातले यश–अपयश नातेसंबंधांतील गुंतागुंत अशा अनेक मानसिक ताणतणाव वाढविणाऱ्या समस्यांचा सामना आपल्यापैकी अनेक जण करत असतात. ताण वाढला की मग मधुमेह, उच्च रक्तदाब, मायग्रेन असे विविध आजार त्यांच्या पाठीशी कायमचे लागतात. अशा वेळी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. मानसोपचारांच्या माध्यमातून विविध प्रकारचे मानसिक आजार आणि भावनिक समस्या दूर करण्यासाठी मदत मिळते.

पण त्याआधी मानसोपचार म्हणजे नेमके काय ते समजून घ्यायला हवे. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीतील व्याख्येनुसार **मानसिक पद्धतींनी मन किंवा व्यक्तिमत्त्वाच्या समस्यांवर उपचार करणे म्हणजे मानसोपचार.** मानसोपचार वैयक्तिक पातळीवर करता येऊ शकतात किंवा जोडीवर, गटावर / समूहावर करता येतात. हे उपचार जसे समोरासमोर प्रत्यक्ष भेटून करता येतात तसेच ते अगदी फोन व इंटरनेटच्या माध्यमातूनही करता येऊ शकतात.

### मानसोपचार तज्ज्ञांची भेट कधी घ्यावी ?

१. भावनांवर नियंत्रण ठेवणे कठीण जात असेल तेव्हा मानसोपचार तज्ज्ञांची भेट घेऊन उपचार घ्यायला हवेत. आयुष्यात कधी ना कधी आपण दुःखी, चिंतातुर किंवा क्रोधित होत असतो आणि तसे होणे स्वाभाविक व सामान्य आहे. पण एखादी भावना दीर्घ काळासाठी असेल, त्यामुळे अनावर असे वर्तन आपणाकडून होत असेल किंवा भीती वाटत असेल आणि याचा दैनंदिन कामावर किंवा वाढीवर परिणाम होत असेल, तर अशा वेळी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे हितावह असते.

२. कामाच्या ठिकाणी किंवा शाळेत तुमच्या क्षमतेनुसार कामगिरी होत नसेल, तर अशी मदत घ्यायला हवी. मानसिक आरोग्याच्या समस्यांमुळे लक्ष विचलित होते, एकाग्रता, स्मरणशक्ती, ऊर्जा यात कमतरता निर्माण होते. परिणामी, औदासीन्य येते, कामाच्या ठिकाणी मिळणारा आनंद कमी होतो किंवा काम करण्यास चालना मिळत नाही. कामातील स्वारस्य कमी होते आणि चुका होऊ लागतात. त्यामुळे उत्पादनक्षमता ढासळू लागते. याचा अतिरेक होऊन नैराश्य येऊ शकते.

३. मानसिक आरोग्याच्या समस्यांमुळे तुमच्या झोपेवर आणि भुकेवर परिणाम होतो. एखादी व्यक्ती चिंताग्रस्त असेल किंवा मानसिक संतुलन ढळलेले असेल तर

त्यांना निद्रानाश होऊ शकतो, तर एखाद्याला नैराश्याने ग्रासले असेल तर ती व्यक्ती कायम झोपून राहू शकते. त्याचप्रमाणे खूप मानसिक ताण असेल तर काही जणांचे खाण्याचे प्रमाण वाढते, तर काही जण अत्यंत कमी खातात. त्यामुळे तुम्ही बऱ्याच काळापासून नेहमीपेक्षा जास्त किंवा कमी खात असाल वा झोपत असल्याचे तुमच्या लक्षात आले तर तातडीने मानसोपचार तज्ज्ञांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

४. तुम्हाला नाती निर्माण करणे आणि ती सांभाळणे कठीण जात असेल , आपल्या मानसिक आरोग्याचा आपल्या नात्यांवर विविध प्रकारे परिणाम होत असेल तर योग्य वेळी उपचार घ्यायला हवेत. मानसिक आजार असलेली व्यक्ती आपल्या जवळच्या व्यक्तींपासून दूर जाऊ शकते, नात्यांमध्ये असुरक्षितता निर्माण होऊ शकते किंवा भावनिक आधारासाठी दुसऱ्या व्यक्तींवर प्रमाणाबाहेर अवलंबून राहू शकते. समोरच्या व्यक्तीसोबत कायम वाद होत आहेत किंवा तुमच्या भावना व्यक्त करण्यात समस्या येत आहे असे वाटत असेल, तर मानसोपचारांनी फायदा होऊ शकतो.

५. तुमच्यावर मानसिक आघात झाला असेल, शारीरिक किंवा मानसिक शोषण किंवा एखाद्या आघाताला सामोरे जावे लागले असेल आणि ततून ती व्यक्ती पूर्णपणे बाहेर आलेली नसेल तर मानसोपचारांनी यावर आराम पडू शकतो.

६. मानसिक किंवा भावनिक समस्यांना सामोऱ्या जाणाऱ्या व्यक्तींना अनेकदा आयुष्यापासून तुटलेपणा जाणवत असतो. परिणामी, त्यांना जी गोष्ट करण्यातून आधी आनंद मिळत असे तीच गोष्ट आता करताना आनंद होत नाही. उदा. एखादा छंद जोपासणे किंवा मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालविणे. अशा परिस्थितीत मानसोपचारांची मदत होऊ शकते.

७. तुम्ही दुःखात आहात – मग तो घटस्फोट असेल, एखाद्या जवळच्या व्यक्तीचा विरह असेल किंवा ती व्यक्ती कायमची सोडून गेली असेल, कोणत्याही प्रकारच्या दुःखावर मात करणे ही एक दीर्घ आणि वेदनादायक प्रक्रिया असू शकते. थेरपी किवा समुपदेशनामुळे त्यातून लवकर बाहेर पडण्यास मदत होते.

८. ताणतणाव, चिंतातुरता आणि नैराश्यासारख्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांचा तुमच्या शारीरिक आरोग्यावर परिणाम होत असतो. मानसिक समस्यांचा मध्यवर्ती चेता यंत्रणेवर परिणाम होत असतो. त्यामुळे अंतस्रावी, रोगप्रतिकारक शक्ती, हृदयाच्या रक्तवाहिन्या, मेंदूतील रक्तवाहिन्या इत्यादींवर परिणाम होऊन आतड्यांमध्ये जळजळ होणे, मायग्रेन, सोरायसिससारखे आजार होतात. त्यामुळे डोकेदुखी, थकवा, स्नायूंमध्ये वेदना, हृदयात धडपड होणे, सततचे आजार, दीर्घ काळापासून असलेली सूज अशी लक्षणे दिसत असतील तर मानसोपचारांची मदत घेणे हितकारक ठरू शकते.

९. तुम्हाला स्वतःमध्ये सुधारणा करायची आहे, पण सुरुवात कुठून करायची ते समजत नाही. अशा वेळी मानसोपचार तज्ज्ञ तुमच्यातील सर्वोत्तम व्यक्तिमत्त्वास वाव मिळवून देऊ शकतात. तुम्ही अधिक चांगले व्हावे यासाठी नेमके काय करावे लागेल, हे समजून धेण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञ तुम्हाला मदत करू शकतात.

१०. व्यसनमुक्तीसाठीही त्यांची मदत होते. जेव्हा एखादी व्यक्ती मानसिक किंवा भावनिक ताणाखाली असते तेव्हा ज्यातून काहीतरी आनंद मिळेल, बधीरपणा येईल किंवा लक्ष विचलित होईल असे काहीतरी करण्याकडे त्या व्यक्तीचा कल असतो. उदा. दारू, सेक्स आणि पार्नचा वापर करण्यात येतो. असे केल्याने हताशपणा, चिडचिड, नकारात्मक विचारांपासून तात्पुरता दिलासा मिहत असेल. पण दीर्घकालीन विचार केल्यास या गोष्टींवरील अवलंबत्व वाढते. मानसोपचारांचा अपयोग मानसिक समस्या आणि व्यवसनमुक्ती अशा दोहोंसाठी होऊ शकतो.

आपल्या समाजात मानसोपचार घेण्यासाठी फारसा कल दिसत नाही. डॉक्टर किंवा मनोविकृती तज्ज्ञांप्रमाणे यांना अजूनही मुख्य प्रवाहातील उपचार समजले जात नाही. मनोविकृतीतज्ज्ञ औषधे देतात, तर मानसोपचारतज्ज्ञ समुपदेशन करतात. जेव्हा रुग्णांना त्यांच्या समस्यांची जाणीव नसते म्हणजेच द्विमनस्कता यासारख्या (स्किझोफ्रेनिया) आजारांमध्ये मनोविकृती चिकित्सकांचे उपचार अधिक लाभदायी असतात. पण जेव्हा व्यक्तीला तिची समस्या माहित असते, तेव्हा मानसोपचार पुरेसे असतात.

**चांगला मानसोपाचार तज्न शोधण्याचे काही पर्याय** :

**१. आजूबाजूच्यांना विचारा** :

ताण येणे हे सामान्य आहे. अशा समस्येवर तुमच्या मित्रांनी किंवा नातेवाईकांनी सामसोपचार तज्ज्ञांची मदत घेतली असण्याची शक्यता असू शकते. त्यामुळे आपल्या ओळखीच्या आणि विश्वासार्ह व्यक्तींकडून अशा एखाद्या चांगल्या मानसोपचार तज्ज्ञांची शिफारस घ्या. तुम्ही आपल्या डॉक्टरांकडूनही शिफारस घेऊ शकता. आयुर्वेद सत्ववजय हा एक प्राचीन मानसोपचार आहे. आता काही आयुर्वेदिक फिजिशिअन्स ही थेरपी शिकले आहेत. या आधारे ते भावनिक समस्यांवर मात करण्यात मदत करू शकतात.

**२. ऑनलाईन शोध घ्या** :

तुमच्या भागातील नामांकित मानसोपचार तज्ज्ञ शोधण्यासाठी ऑनलाईन सर्च करा. www.ayursattva.in या वेबसाइटवर आणि इतर स्थानिक संस्थांमध्ये ही माहिती मिळू शकेल. तुम्ही ऑनलाईन समुपदेशनाचा पर्यायही स्वीकारू कशता.

**३. एक छोटीशी भेट वजा मुलाखत :**

मानसोपचार तज्ज्ञाला फोन करा आणि फोनवरूनच एक छोटीशी मुलाखत घ्या. कामाची वेळ, फ्री, लोकेशन याविषयी प्रश्न विचारून तुम्ही त्या मानसोपचार तज्ज्ञांचा अंदाज घेऊ शकता.

**४. दोन मानसोपचार तज्ज्ञांनी सुरुवात करा :**

मानसोपचारांमध्ये मानसोपचार तज्ज्ञ आणि क्लाएंट यांचे परस्परांशी चांगले संबंध जुळणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे एकावर अवलंबून न राहता दोघांची नावे सुचविण्यास सांगा. याचा खर्च जरा जास्त होईल, पण यातून तुमच्यासाठी योग्य कोण याची तुम्हालां निवड करता येईल.

**मानसोपचार तज्ज्ञांची निवड केल्यानंतर आणि समुपदेशन सत्र सुरू केल्यानंतर याचा फायदा होत आहे का.. हे तपासून कसे पाहावे ? :**

**१.** तुमच्यावरील मानसोपाचार परिणामकारक व्हावेत असे वाटत असेल, तर तात्पुरता आराम वाटणे अपेक्षित नाही, तर तुमच्यात दीर्घकालीन बदल होणे अपेक्षित आहे. तुमच्यातील भावनिक प्रतिक्रिया किंवा गैरवर्तणूक यात थोडाफार तरी बदल होत असेल तर मानसोपचारांचा उपयोग होत आहे, असे समजावे.

२. जेव्हा रुग्ण (क्लाएंट) कोणतीही काळजी न करता किंवा मानसोपचार तज्ज्ञ क्लाएंटविषयी पूर्वग्रह तयार करतील याची भीड न बाळगता त्याची रहस्ये सांगेल तेव्हा क्लाएंट आणि थेरपिस्ट यांच्यातील नाते जवळकीचे आहे, असे समजावे. तसे होत असेल तर मानसोपचारांचा उपयोग होत आहे.

३. मानसोपचारांसाठी तुमचे नियोजन आणि ध्येय असणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया अनंत काळ चालणारी नसावी. भावनांना हाताळण्याचे कौशल्य तुम्ही आत्मसात केले पाहिजे आणि मानसोपचार तज्ज्ञांच्यामदतीविना तुम्हाला हे जमायला हवे.

४. मानसोपचारांचा उपयोग होत आहे, हे समजण्याचे संकेत खूपच सोपे आहेत. तुम्हाला मनातून चांगले वाटू लागते. तुम्ही पॅनिक ॲटॅक किंवा ॲक्झायटी ॲटॅकवर उपचार घेत असाल तर त्यांची संख्या कमी होते. एका रात्रीत ते जाणार नहात. काही वेळा त्यात अपयश येणे हेसुद्धा सामान्य आहे. पण मानसोपचारांच्या माध्यमातून तुम्ही ज्या समस्या सोडवत आहात त्यांच्यामध्ये लक्षणीय कमतरता जाणवणे अपेक्षित आहे.

५. तुम्हाला तुमच्या व्यक्तिमत्त्वात बदल घडवायचा असेल तर तीन किंवा चार महिन्यांमध्ये चिंतातुरता नैराश्य कमी होणे अपेक्षित आहे. पण व्यक्तिमत्त्वातच काही आजार असेल, तर या प्रक्रियेत अनेक वर्षे लागू शकतात.

नात्यांमधील तणाव आणि भावनिक समस्या यात वाढ होत असताना तुम्ही मानसोपचाराची मदत घेणे टाळू नये. कुणीतरी आपल्याला हसेल या भयास्तव अशी भेट घेणे आजही अनेकजण टाळतात. पण मानसोपचार तज्ज्ञांची भेट घेणे हे एखाद्या सी.ए.ची किंवा कायदेतज्ज्ञाची मदत घेण्याइतके सर्वसामान्य आहे.

(लेखक अनुभवी सायकोथेरपिस्ट आहेत.
**Google** वरून साभार.)

◆◆◆

## Cochlea Pune for Hearing and Speech Swaranaad Rehabilitation Center

### HSC Result Academic 2024-2025

| Sr.No. | Name of the Student | Percentage |
|---|---|---|
| 1. | Gaikwad Tanaya Bipin | 54.17% |
| 2. | Nanekar Aaryan | 50.17% |
| 3. | Gengaje Siddhi Jivan | 48.50% |
| 4. | Gandhile Sumit Santosh | 43.50% |

### SSC Result Academic 2024-2025

| Sr.No. | Name of the Student | Percentage |
|---|---|---|
| 1. | Chalva Kirti Balaji | 70.40% |
| 2. | Makwan Rohit Pramod | 82.80% |
| 3. | Khandare Poonam Pravin | 76.00% |
| 4. | Jadhav Aaryan Abhijeet | 59.20% |
| 5. | Nighot Sharayu Samir | 49.00% |
| 6. | Anushka Patole | 41.00% |

# BREAKING DOWN THE WALL OF SILENCE

**Mrs. Pallavi Sharma**
Public Relation Officer

This is a tale of Vasant Rathod, a boy of 3 years of age dwelling in a city named Ambajogai, in Beed district of Maharashtra.

At the age of 1 year and 6 months, his parents realised that he could not perceive the sounds around him. They took him to the audiologist. Vasant underwentan audiological test named BERA, confirming profound 100% bilateral hearing loss. He started using hearing aid as per the advice of the audiologist.

Despite using the hearing aid for continuous 5 months and attending speech therapy simultaneously, there was no benefit at all. An aided audiogram confirmed no progress at all. A cochlear implant surgery was suggested to Vasant. Cochlear Implant is a bionic ear providing a natural sense of hearing by directly stimulating the auditory nerve unlike a hearing aid which just amplifies the sound. The parents took an entire year to figure out an optimal path of treatment for Vasant.

A Cochlear Implant surgery is an expensive method of treatment, costing around 8 lakhs which includes hospitalization and medicines. Coming from an underprivileged background and barely making ends meet, it surely was an arduous task to fund for this surgery. The parents had to take financial support from a funding firm, donation or sponsor.

Their prayers were answered when Vasant was scheduled for the cochlear implant surgery through adonation given by Persistent Foundation.

Vasant was finally operated at the age of 3 years and 3 months at Moraya Super-Specialty Hospital. Currently, he has adjusted to the new implant. He is now receptive to conditioning of sounds and is undergoing therapy sessions twice a week, striving to communicate and is attending a small preschool. Such charity does help in turning a child's life around for the better.

In solidarity, we can make a difference to help change lives, one donation at a time. Every penny counts in helping the child breathe in a new life through a cochlear implant surgery, rehabilitation, and helping the child stand on his own two feet in our society.

With profound gratitude and sincere thank you, Persistent Foundation for your generosity which has helped Vasant Rathod step into the auditory world.

◆◆◆









# Expert Healing through Gentle Hands and Kind Heart

**Mrs. Pallavi Sharma**
Public Relation Officer

Dr Wachasundar ENT Clinic, is an age-old trust worthy clinic, run by Dr Avinash M. Wachasundar, since 1993, conveniently located at Shivajinagar. They are dealing in the field of medical and surgical management of ear, nose and throat conditions.

Dr Avinash Wach as undar is a certified, renowned, practicing ENT surgeon and otorhinolaryngologist for the past few decades. He is an expert in dealing with all maladies related to the Ear, Nose and Throat. Having said that, he is a certified Cochlear Implant surgeon from the prestigious House Ear Institute (USA). His specialty lies in performing Cochlear Implant surgeries on hearing-impaired children ranging from 6 months till 6 years of age.

Following the footsteps of his father, Dr Akshay Avinash Wachasundar, MBBS MS ENT, holds a Fellowship in Cochlear Implants under the teaching and mentoring of Padmashri Dr.Milind Kirtane. Dr Akshay is one of the youngest ENT surgeons to perform 300+cochlear implant surgeries.

This clinic is well equipped with a fully functional Operation Theatre offering comprehensive amenities to perform all surgeries with regards to the ear, nose and throat. It is a treatment center that houses operated patients and renders consultations to every ailment concerning the ear, nose and throat. This clinic caters to people from all walks of life. The caring and polite staff attends to the needs and comforts of inpatients and outpatients as well. They maintain standard practices of hygiene and cleanliness in the best possible way.

This father-son duo, good hearted doctors, not only having a name in the domain of cochlear implant surgeries but also have been praised for accurate diagnosis, prescribe appropriate medicines and suggest medical treatment apt for that particular ailment related to the ear, nose and throat. There are testimonials verifying this and commending these two doctors for the medical services they provide at their clinic.

Not only have they proven to be excellent in their skilled professionbut are benevolent doctors as well who believe in giving the right information on the prognosis and moving in the best way forward in treating the patient.

Please do not hesitate or think twice before reaching out to Dr Avinash Wachasundar and Dr Akshay Wachasundar, at their clinic. You will not be disappointed! Have faith and trust knowing that you are in good set of hands!!

◆◆◆


COCHLEA - PUNE
FOR HEARING & SPEECH
"Yes! Every Deaf Child Will Speak"
स्वरनाद
SWARANAAD REHABILITAION CENTER KOTHRUD
ADMISSION OPEN
for 2025-2026
OUR FEATURES
• Audiological Services
• RCI Registered & Experienced Special Educators
• Psychological Testing
• Parents & Family Counselling
• E-learning
• Library
• Medium : Marathi &hindi
AGE (0-3) PARENT INFANT PROGRAM (FOCUSED DEVELOPMENT PROGRAM)
AGE (3-6) REHABILITATION & PRESCHOOL
THERAPY
• SPEECH THERAPY
• AUDIOTRY VERBAL THERAPY
• OCCUPATIONAL THERAPY
• BEHAVIOURALTHERAPY
• PLAY THERAPY
MORE INFORMATION
9371420994
https://cochleaswaranaad.org/
Bindu Madhav Thakrey Hospital, happy Colony Road, Kothrud, Pune 411038

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - APRIL 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 237 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 76 |
| 3. | Aided Audiogram Testing | 8 |
| 4. | No. of Speech Assessment | 15 |
| 5. | No. of Counseling Sessions | 15 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 32 |
| 7. | No. of students getting Individual OT | 40 |
| 8. | Group Occupational Therapy Sessions | 1 |
| 9. | Psychological Assessment | 3 |
| 10. | Activity Therapies | 83 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - APRIL 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 15 |
| 2. | Narayangoan | 38 |
| 3. | Pimpari | 116 |
| 4. | Chinchwad | 78 |
| 5. | Phonda | 24 |
| 6. | Porvorim | 18 |
| 7. | Manchar | 75 |
| 8. | Daund | 18 |
| 9. | Urawade (Residential) | 24 |
| 10. | Kudal | 58 |

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

**कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अ‍ॅण्ड स्पीच**
**स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र**

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२५-२६**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन - ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

**HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/**

**पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
**उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.**

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
डॉ. खैर जीवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल,
नारायणगाव जुन्नर रोड, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**

A painting by Aryan Jadhav
- Sold Out -



प्रदर्शन

**Painting, by past students of 'Swaranaad' doing Art Course in 'Abhinav'**



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th JUNE, 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.






# प्रदर्शन



**Address :**

**To,**